# वसई विरार शहर महानगरपालिका

**रमाबाई अपार्टमेंट, चामुंडानगर, स्वामी समर्थ नगर (जुने), विजयनगर, विरार (पु.) येथील दुर्घटनेबाबत**

**प्रेसनोट**

**दि.२७/०८/२०२५,**
**वेळ :- दु. १.१५ वा.**

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती “सी” चंदनसार प्रभागातील चामुंडानगर, स्वामीसमर्थ नगर, विजयनगर, नारंगी रोड, विरार (पू.) येथिल रमाबाई अपार्टमेंट या इमारतीचा मागील भाग मंगळवार दि. २६/०८/२०२५ रोजी रात्री सुमारे ११.४५ वा. दरम्यान अचानक कोसळला. याबाबत माहिती मिळताच घटनास्थळी महानगरपालिकेचे कर्मचारी, पोलिस दल, अग्निशमन दल, एन.डी.आर.एफ ची तुकडी वेळेवर दाखल झाली व बचावकार्य युध्द पातळीवर सुरु करण्यात आले. सदरील इमारतीमध्ये एकूण ५० सदनिका असून त्यापैकी सदर इमारतीचा पाठीमागचा भाग कोसळला गेला असल्याने (अंदाजे १२ सदनिका) त्याखाली अंदाजे १५ ते २० रहिवासी अडकले असण्याची शक्यता असून पैकी आत्तापर्यंत ११ रहिवाशांना बाहेर काढण्यात आले असून त्यापैकी २ मयत झाले आहेत. उर्वरीत ९ रहिवाशांना उपचाराकरीता वेगवेगळया मनपा व खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते पैकी ३ लोकांना प्रथमोपचारानंतर नातेवाईकांकडे सोडले आहे.

इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरीकांना बाहेर काढण्याचे काम युध्दपातळीवर सुरु असून इमारतीच्या उर्वरीत हिश्यातील रहिवाश्यांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने रमाबाई अपार्टमेंट इमारतीच्या बाजुची G+3 इमारत व आजुबाजुच्या चाळींमधल्या खोल्या देखील रिकाम्या करुन त्यांना सुरक्षितस्थळी स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. महानगरपालिकेच्या वतीने या सर्व बाधीत नागरीकांची तात्पुरती राहण्याची व भोजनाची सोय करण्यात आलेली आहे.

**सोबत - अपघातग्रस्त नागरीकांची यादी जोडली आहे.**

| अ.क्र. | नाव | वय | तपशिल |
|---|---|---|---|
| १. | श्री.प्रभाकर शिंदे | ५७ वर्ष | महानगरपालिकेचे तुळींज हॉस्पिटल |
| २. | श्रीम.प्रमिला प्रभाकर शिंदे | ५० वर्ष | रिध्दीविनायक हॉस्पिटल |
| ३. | श्रीम.प्रेरणा शिंदे | २० वर्ष | महानगरपालिकेचे तुळींज हॉस्पिटल |
| ४. | श्री.प्रदीप कदम | ४० वर्ष | उपचारानंतर सोडण्यात आले |
| ५. | श्रीम.जयश्री कदम | ३३ वर्ष | उपचारानंतर सोडण्यात आले |
| ६. | श्रीम.मिताली परमार | २८ वर्ष | संजीवनी हॉस्पिटल, विरार (प.) |
| ७. | श्रीम.संजॉय सिंग | २४ वर्ष | प्रकृती हॉस्पिटल, बोळींज विरार (प.) |
| ८. | श्री. मंथन शिंदे | १९ वर्ष | प्रकृती हॉस्पिटल, बोळींज विरार (प.) |
| ९. | श्रीम. विशाखा जोवील | २४ वर्ष | प्रकृती हॉस्पिटल, बोळींज विरार (प.) |
| १०. | श्रीम. आरोही ओंकार जोवील | २४ वर्ष | मयत |
| ११. | उत्कर्षा जोवील | १ वर्ष | मयत |